नि.फौ.ख.क्र.७७१/२०१८
नि.क्र.२६

मी शपथेवर खरे सांगते की,

माझे नांव – संगीता दिपक जाधव,
वय अंदाजे ४९ वर्ष, कामधंदा– ब.क्र.११२९ पोलीस हवालदार, जिल्हा विशेष शाखा, वर्धा.
राहणार– कारला चौक, वर्धा, तह. जि. वर्धा.

.................................................................................................................

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.४ ची सरतपासणी– सरकारी वकील श्री. एस. एम. दुंगे यांच्या मार्फत.**

१. दिनांक २४.०५.२०१८ रोजी मी पोलीस स्टेशन, वर्धा येथे नापोशी म्हणून कार्यरत होती. त्यावेळेस माझे नाव संगीता नानाजी तामगाडगे होते. अपराध क्र. ७११/२०१८ ची केस डायरी मला तपासकामी प्राप्त झाली होती. त्यासोबत एफआयआर, घटनास्थळ पंचनामा, फिर्याद मला तपासकामी मिळाली होती. पुर्वी तपास सतिश दुधाने व सुरेश दुर्गे यांनी केला होता. तपास मिळाल्यानंतर मी साक्षीदारांची बयाणे त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविली. आरोपीला अटक केली. तपासाअंती सबळ पुरावा मिळाल्यावरुन आरोपीविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. आरोपीचा गैरहजेरीचा अर्ज आहे तेव्हा आरोपी दाखविल्यास ओळखू शकतो.

**आरोपीतर्फे – कु.के.आर.गडपाल लोक अभिरक्षक यांचेमार्फत उलट तपास**

२. हे म्हणणे खरे आहे की तपास माझेकडे सोपविल्याबाबत आदेश अभिलेखावर दाखल नाही. हे म्हणणे खरे आहे की तपास कामी जाणे येण्याची नोंद घ्यावी लागते. हे म्हणणे खरे आहे की ती नोंद अभिलेखावर दाखल नाही. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळ हे दाट लोकवस्तीचे आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आजुबाजुच्या इतर लोकांची बयाण नोंदविले नाही. हे म्हणणे खरे आहे की फिर्यादीच्या नातेवाईकांशिवाय इतर कोणाचेही बयाण नोंदविले नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटा तपास करुन खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे आहे की आरोपी व आरोपीचा भाऊ यांचेमध्ये बक–यांच्या कारणावरुन जुना वाद होता असे निष्पन्न झाले होते. हे म्हणणे खरे नाही की आज मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास – काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

MRUNAL YASHWANT DOIPHODE Digitally signed by MRUNAL YASHWANT DOIPHODE Date: 2026.06.29 16:55:03 +0530

(श्रीमती एम.वाय.डोईफोडे)

मुख्य न्यायदंडाधिकारी,

वर्धा, दिनांक २९.०६.२०२६

माझे समक्ष

MRUNAL YASHWANT DOIPHODE Digitally signed by MRUNAL YASHWANT DOIPHODE Date: 2026.06.29 16:55:08 +0530

(श्रीमती एम.वाय.डोईफोडे)

मुख्य न्यायदंडाधिकारी,

वर्धा, दिनांक २९.०६.२०२६.